खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२३–२४

### साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला – डॉ. अमोल कोल्हे

पुढारी

# नितीश कुमारांची भूमिका धक्कादायक

## खा. डॉ.अमोल कोल्हे यांचे मत

**राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा**

इंडिया आघाडीत फूट पडलेली नाही. मात्र, नितीश कुमारांची भाजपबरोबर जाण्याची भूमिका धक्कादायक असल्याचे स्पष्ट मत शिरूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी व्यक्त केले.

राजगुरुनगर येथे साहेबराव बुट्टे पाटील स्मृती व्याख्यानमालेत मंगळवारी (दि. ३०) 'छत्रपती शिवाजी महाराज : काल, आज आणि उद्या' या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत डॉ. कोल्हे बोलत होते. सध्याची राजकीय स्थिती विचारात घेता राजकारणात काहीही घडू शकते. मग आपण येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत उपमुख्यमंत्री अजित पवार गटाचे महायुतीचे उमेदवार म्हणून समोर येईल का? असे विचारता, डॉ कोल्हे यांनी भूमिका लवकर स्पष्ट केली नाही. मात्र, वारंवार पाठपुरावा केल्यावर खासदार शरद पवार 'सांगतील ते धोरण आणि बांधतील ते तोरण' असे सांगत विषयांतर केले. राम मंदिर लोकार्पण,



साहेबराव बुट्टे पाटील स्मृती व्याख्यानमालेत बोलताना खा. अमोल कोल्हे.

मराठा आरक्षण आंदोलन, यावर थेट आक्षेप न घेता ते म्हणाले, या घटना घडल्या म्हणजे शेतकरी, सर्वसामान्य जनतेच्या हातात काही पडणार नाही.

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टे पाटील, संचालक हिरामण सातकर, बाळासाहेब सांडभोर, अॅड. राजमाला बुट्टे पाटील, प्रबंधक कैलास पाचारणे, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, प्रा. डॉ. संजय शिंदे आदी मान्यवर, विद्यार्थी, ग्रामस्थ या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

My Gramin Edition
Feb 1, 2024 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

लोकमत

# अष्टप्रधान मंडळ हा सोशल इंजिनिअरिंगचाच प्रयोग

## डॉ. कोल्हे : बुट्टे पाटील स्मृती व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क.

**राजगुरुनगर :** औरंगजेबाच्या बलाढ्य



मोघल सत्तेला आव्हान देणारे छत्रपती शिवाजी महाराज मराठी स्वाभिमानाचा अंगार होते. त्यांचे अष्टप्रधान मंडळ हा सोशल इंजिनिअरिंगचा यशस्वी प्रयोग असल्याचे गौरवोद्गार खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी काढले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ आयोजित साहेबरावजी बुट्टे पाटील स्मृती व्याख्यानमालेत ''छत्रपती शिवाजी महाराज : काल, आज आणि उद्या'' या विषयावर बोलत होते. याप्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रदेश महिला उपाध्यक्षा ॲड. राजमाला बुट्टे पाटील, संस्था संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, प्राचार्य डॉ. एस.एस.पिंगळे, डॉ.एच.एम.जरे, प्रबंधक कैलास पाचारणे आणि विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ. कोल्हे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांना कुठलाही राजकीय वारसा नसताना त्यांनी अत्यंत संघर्षाने रयतेचे राज्य उभे केले. त्यांनी संकटांना संधी मानले. शिवाजी महाराजांचे अष्टप्रधान मंडळ हा सोशल इंजिनिअरिंगचा यशस्वी प्रयोग होता, असे ते म्हणाले. शिवाजी महाराजांना त्यांचे सामर्थ्य व मर्यादा माहीत असल्याने त्यांनी आरमाराची उभारणी केली. गनिमी कावा वापरला. सर्व जाती-धर्मांच्या मावळ्यांना सोबत घेतले. महिलांचा सन्मान केला. राजमाता जिजाऊंच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत चातुर्याने त्यांनी स्वराज्य स्थापन केल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाचे चिंतन करावे व त्यांच्या संघर्षाचा वारसा समोर ठेवून प्रामाणिकपणे शिक्षण घेऊन करिअर करावे, असे आवाहन त्यांनी केले.

सूत्रसंचालन प्रा.धनंजय बोऱ्हाडे यांनी, परिचय प्रा. उमेश जगताप यांनी तर आभार दिव्या पिंगळे हिने मानले.

Hello Pune Gramin
Page No. 3 Feb 01, 2024
Powered by: erelego.com

पुण्य नगरी

# मराठी स्वाभिमानाचा अंगार म्हणजे शिवाजी महाराज : डॉ. कोल्हे

**शिरोली** : औरंगजेबाच्या बलाढ्य मोघल सत्तेला आव्हान देणारे छत्रपती शिवाजी महाराज मराठी स्वाभिमानाचा अंगार असल्याचे गौरवोद्गार खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी काढले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'छत्रपती शिवाजी महाराज : काल, आज आणि उद्या' या विषयावर बोलत होते. या प्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रदेश महिला उपाध्यक्षा ॲड. राजमाला बुट्टेपाटील, बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, प्राचार्य डॉ. एस.एस.पिंगळे आदी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाचे चिंतन करावे व त्यांच्या संघर्षाचा वारसा समोर ठेवून प्रामाणिकपणे शिक्षण घेऊन करिअर करावे, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.धनंजय बोऱ्हाडे यांनी, परिचय प्रा. उमेश जगताप यांनी तर आभार दिव्या पिंगळे हिने मानले.

Smart Pimpri Chinchwad Edition
Feb 1, 2024 Page No. 01
Powered by : eReleGo.com

सकाळ

# अमोल कोल्हे यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन




डॉ. अमोल कोल्हे

**राजगुरुनगर :** औरंगजेबाच्या बलाढ्य मुघल सत्तेला आव्हान देणारे छत्रपती शिवाजी महाराज मराठी स्वाभिमानाचा अंगार असल्याचे गौरवोद्गार खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी येथे काढले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ आयोजित साहेबराव बुट्टे-पाटील स्मृती व्याख्यानमालेत ''छत्रपती शिवाजी महाराज: काल, आज आणि उद्या'' या विषयावर बोलत होते. या वेळी डॉ. कोल्हे पुढे म्हणाले की, "छत्रपती शिवाजी महाराजांना कुठलाही राजकीय वारसा नसताना त्यांनी अत्यंत संघर्षाने रयतेचे राज्य उभे केले. महाराजांचे अष्टप्रधान मंडळ हा सोशल इंजिनिअरिंगचा यशस्वी प्रयोग होता. राजमाता जिजाऊंच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत चातुर्याने त्यांनी स्वराज्य स्थापन केले." विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाचे चिंतन करावे. त्यांच्या संघर्षातून प्रेरणा घेऊन उत्तुंग करिअर करावे, असे आवाहन देखील त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. धनंजय बोऱ्हाडे यांनी केले. परिचय प्रा. उमेश जगताप यांनी करून दिला, तर आभार दिव्या पिंगळे हिने मानले.

Pune, District-Today
03/02/2024 Page No. 7

# मराठी स्वाभिमानाचा अंगार म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज : डॉ. अमोल कोल्हे

**राजगुरूनगर, (वार्ताहर) :** औरंगजेबाच्या बलाढ्य मोघल सत्तेला आव्हान देणारे छत्रपती शिवाजी महाराज मराठी स्वाभिमानाचा अंगार असल्याचे गौरवोद्गार खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी काढले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'छत्रपती शिवाजी महाराज : काल, आज आणि उद्या' या विषयावर बोलत होते.



या प्रसंगी संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टे पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रदेश महिला उपाध्यक्षा राजमाला बुट्टेपाटील, संस्था संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, डॉ. एच. एम. जरे, प्रबंधक कैलास पाचारणे आणि विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ उपस्थित होते.

डॉ. अमोल कोल्हे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांना कुठलाही राजकीय वारसा नसताना त्यांनी अत्यंत संघर्षाने रयतेचे राज्य उभे केले. त्यांनी संकटांना संधी मानले. शिवाजी महाराजांचे अष्टप्रधान मंडळ हा सोशल इंजिनिअरिंगचा यशस्वी प्रयोग होता, असे ते म्हणाले. शिवाजी महाराजांना त्यांचे सामर्थ्य व मर्यादा माहीत असल्याने त्यांनी आरमाराची उभारणी केली. गनिमी कावा वापरला.

सर्व जाती-धर्मांच्या मावळ्यांना सोबत घेतले. महिलांचा सन्मान केला. राजमाता जिजाऊंच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत चातुर्याने त्यांनी स्वराज्य स्थापन केल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाचे चिंतन करावे व त्यांच्या संघर्षाचा वारसा समोर ठेवून प्रामाणिकपणे शिक्षण घेऊन करिअर करावे, असे आवाहन त्यांनी केले.

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभागप्रमुख**